।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Office of the Controller of Examinations

Phone: (02462)229294 website: srtmun.ac.in E-mail: srtmuncoe@gmail.com

FAX No: (02462) 229520

जा.क्र.संचालकपमुमं/दिव्यांग/सोयीसवलती/कार्यवाही/२०१६-१७/**७४** दिनांक : २०/०४/२०१७.

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

**मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये**

मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.

मा. संचालक, सर्व मान्यता प्राप्त संस्था

मा. संचालक, उपकेंद्र लातूर, प्रस्तुत विद्यापीठ.

मा. प्राचार्य, न्यू मॉडेल कॉलेज हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ.

मा. विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग

विषय : **उच्च शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये सोयी-सवलती देणेबाबत.**

संदर्भ :१.जा.क्र.पनिका/अंधवबहुविकलांग/सोयी/२०१६-१७/६१५, दि.२८/११/२०१६.

२.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३/दि.०४ मार्च २०१७.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, उच्च शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये व इतर शैक्षणिक सोयी-सवलती देण्याबाबत प्रस्तुत विद्यापीठाकडुन संदर्भीय पत्र क्र. ०१ नुसार परिपत्रकाव्दारे नियमावली तयार करण्यात आलेली होती. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासुन या नियमावलीची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संलग्नीत महाविद्यालये, उपकेंद्र लातूर व सर्व शैक्षणिक संकुलांना कळविण्यात आलेले होते.

तथापि, संदर्भीय पत्र क्र. ०२ नुसार उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दि. ०४ मार्च २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार उच्च शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक व परीक्षेमध्ये सोयी-सवलती देण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत. या निर्देशाची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या महाविद्यालयात/संस्थेत/संकुलात उच्च शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी सवलती देण्याबाबतची उचित कार्यवाही करण्यात यावी. (सोबत : शासन निर्णय दि. ०४ मार्च २०१७ ची प्रत.)

सबब, उपरोक्त विषयी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शासन निर्णय निर्गमीत केल्यामुळे प्रस्तुत विद्यापीठाचे संदर्भीय परिपत्रक क्र. ०१ हे रदद् समजण्यात यावे व शासनाने निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करण्यात यावी.

कळावे,

आपला,

**संचालक**

परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :**

उपकुलसचिव/सहाय्यक कुलसचिव, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

अधिक्षक सर्व विद्याशाखा, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना
परिक्षेमध्ये सोयी-सवलती देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ३०२/विशि-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४ मार्च, २०१७.

**प्रस्तावना:-**

राज्यातील सर्व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांचे अध्ययन, अध्यापन व मुल्यमापनाची पध्दती वेगळी असणे आवश्यक आहे. विषेश गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना शैक्षणिक मुल्यमापनामध्ये गरजेनुरूप सोयी सवलती देण्यासंदर्भात धोरण निश्चितीसाठी शासन स्तरावरुन समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकीमध्ये सर्व अकृषी विद्यापीठाचे परिक्षा नियंत्रक व दिव्यांगांशी संबंधीत असलेल्या विविध संस्थांचे तज्ञ प्रतिनिधी उपस्थित होते. सदरहू बैठकीमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणामध्ये येणाऱ्या अडचणी व परिक्षा पध्दतीमध्ये त्यांना दिल्या जात असलेल्या व आवश्यक असलेल्या सोयी सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यानुसार आवश्यक त्या सूचना व अभिप्राय मागविण्यात आले. प्राप्त अभिप्राय व सूचनांचा विचार करून उच्च शिक्षण/विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार खाली नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांची खालीलप्रमाणे वर्गवारी आहे.

१. पूर्णत: अंध (Blindness)
२. अंशत: अंध (Low vision/ Partial Blind)
३. कुष्ठरोग निवारित ( Leprosy Cured Persons)
४. कर्णबधिर (Hearing Impairment - deft and hard of hearing )
५. लोकोमोटर डिसेबिलिटी अस्थिव्यंगासह (Locomotor Disability including Orthopedic disability)
६. शारिरीक वाढ खुंटणे (Dwarfism)
७. बौध्दिक अक्षम (मतिमंद/गतिमंद) (Intellectual Disability -Mentally challenged/Slow Learners)
८. मानसिक आजार (Mental Illness)
९. स्वमग्न (Autism Spectrum Disorder)
१०. सेरेब्रल पाल्सी (Cerebral palsy)
११. स्नायुंची विकृती (Muscular Dystrophy)
१२. मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological Conditions)
१३. अध्ययन अक्षम (Specific Learning Disabilities)
१४. बहुविध द्‌धन अपदयरर (Multiple Sclerosis)
१५. भाषण (वाचा) व भाषा अक्षमत्व (Speech and Language Disability)
१६. थॅलस्सेमिया (Thalassemia)/ कॅन्सर (Cancer)
१७. हिमोफिलिया (Hemophilia)
१८. सिकल सेल आजार (Sickle Cell Disease)
१९. बहुविकलांग (Multiple Disabilities)

२०. ॲसिड ॲटॅक व्हिक्टीम (Acid Attack Victim)

२१. पार्किसन्स आजार (Parkinson॰s disease)

(१) उपरोक्त सर्व प्रकारातील उच्च शिक्षण संस्थांमधील/ विद्यापीठ स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना खालील नमूद समान सोयी-सुविधा व सवलती उपलब्ध करुन देण्यात याव्यात :-